# 1.दस्त नोंदणीस सादर करणेस झालेला विलंब माफी

## Delay condone for presenting document

विषय ओळख (About)

दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीस सादर करणेकरीता, कलम 23 नुसार कालावधी विहीत करण्यात आलेला आहे. सदरचा कालावधी संपुष्टात आल्यास, अतिरीक्त मुदतीचा कालावधी देण्यात आलेला आहे.

परंतु अशी अतिरीक्त मूदतवाढ ही काही समर्थनीय कारणामुळेच/ न टाळता येणारी परीस्थीती उदभवल्यामुळे दस्त नोदंणीस मुदतीत सादर करण्यात आला नाही, याची खातरजमा झाल्यासच व विलंब फी भरणेची तयार असल्यासच मान्य करता येते. सदरचे कारण व फी भरणेची तयारी दर्शविणेसाठी अशा पक्षकारास जिल्हा निंबधक यांचे नावाने केलेला अर्ज दुय्यम निबंधक कार्यालयात सादर करावा लागतो.

मान्य करुन झालेला विलंब माफ करण्याचे अधिकार हे जिल्हा निबंधक यांना कलम 25 नुसार प्रंदान करण्यात आलेले आहेत. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< इतर काही महत्वाच्या बाबी<सूचीमधील दुरुस्ती विशेष मुखत्यारपत्र पहावे.

# 2. कबुलीजबाबासाठी झालेला विलंब माफी

## Delay condone for admitting execution

विषय ओळख (About)

दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीस सादर करतंना, दस्तातील ज्या पक्षकारांनी त्यांचा कबुलीजबाब दिलेला नाही, त्यांचेसाठी दस्त नोदंणीस तहकुब ठेवला जातो. असा कबुलीजबाब विहीत मुदतीत दुय्यम निबंधक यांचेसमोर उपस्थीत होउन दयावा लागतो. अशा विहीत मदुतीत असा पक्षकार कार्यालयात उपस्थीत होउ शकत नसल्यास अतिरीक्त मुदतीचा कालावधी देण्यात आलेला आहे.

परंतु अशी अतिरीक्त मूदतवाढ ही काही समर्थनीय कारणामुळेच/ न टाळता येणारी परीस्थीती उदभवल्यामुळे तो कबुलीजबाबासाठी मुदतीत येउ शकला नाही, याची खातरजमा झाल्यासच व विलंब फी भरणेची तयार असल्यासच मान्य करता येते. सदरचे कारण व फी भरणेची तयारी दर्शविणेसाठी अशा पक्षकारास जिल्हा निंबधक यांचे नावाने केलेला अर्ज दुय्यम निबंधक कार्यालयात सादर करावा लागतो. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< इतर काही महत्वाच्या बाबी<सूचीमधील दुरुस्ती विशेष मुखत्यारपत्र पहावे.

मान्य करुन झालेला विलंब माफ करण्याचे अधिकार हे जिल्हा निबंधक यांना कलम 25 नुसार प्रंदान करण्यात आलेले आहेत.